# इचलकरंजी महानगरपालिका

प्रस्ताव : महानगरपालिकेचे विविध विभागाकडील प्रदान प्रमाणके/ धनादेश स्वाक्षरीसाठी नियंत्रण अधिकारी यांना प्राधिकृत करण्याबाबत तसेच विकास कामांचे संविदा करारपत्रावर मुद्रा लावणेकामी अधिका-यांचे नामनिर्देशन करण्याबाबत.

प्रस्ताव :

संदर्भ – १. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ४ (१) (क) सह ६७ (३), ६८
२. जा.क्र. आयुक्त् कार्या/०२/१३६/२०२३ दि. ०५/०९/२०२३ चे आदेश
३. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ८४ व परिशिष्ठ चार
४. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसुची ड प्रकरण ५ नियम १ (२)

उपरोक्त संदर्भ क्र. १ वरील अधिनियमातील तरतुदीनुसार महानगरपालिकेमार्फत पार पाडावयाच्या कामकाजासाठी महानगरपालिकेचे उपायुक्त / सहा. आयुक्त यांना संदर्भ क्र. २ वरील आदेशान्वये आयुक्तांचे नियंत्रण व पुनरीक्षणाचे अधीन राहुन विभागनिहाय नियंत्रण अधिकारी म्हणुन घोषित करण्यात आलेले आहे.

मुख्य लेखाधिकारी यांचेसह नियंत्रण अधिकारी यांना, संदर्भ क्र. २ वरील आदेशान्वये सोपविण्यात आलेल्या त्यांचे अधिनस्त् विभागाकडील विविध स्वरुपाची प्रमाणके व त्यानुसार आदा करावयाचे धनादेश संदर्भ क्र. ३ वरील तरतुदीनुसार स्वाक्षरीत करण्यासाठी प्राधिकृत करणेबाबत. तथापि, श्री. केतन गुजर, प्र. सहा आयुक्त् यांचेकडे सोपविण्यात आलेल्या विभागाकडील ग्रंथालय व अनाधिकृत बांधकाम हे विभाग वगळुन प्रदान प्रमाणके व त्यानुसार आदा करावयाचे धनादेश हे उपायुक्त् (मुख्यालय) यांनी स्वाक्षरीत करणेबाबत तसेच धनादेशावर स्वाक्षरी करताना व देयके आदा करताना सर्व लेखा नियमांचे व महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीचे पालन कटाक्षाने करण्याची जबाबदारी मुख्य् लेखाधिकारी व संबंधीत नियंत्रण अधिकारी यांची राहील. स्वाक्षरी केलेल्या धनादेशाचे एकत्रित विविरणपत्र प्रत्येक आठवडयास निम्न् स्वाक्षरीकार यांचेकडे सादर करणे बंधनकारक राहील.

त्याचप्रमाणे संदर्भ क्र. ४ वरील तरतुदीनुसार इचलकरंजी महानगरपालिकेच्या विविध विभागाकडुन वेगवेगळया स्वरुपांच्या कामांची (संविदा) करारपत्रावर मुद्रा लावण्याबददल स्वाक्षरी करण्यासाठी वरील परिच्छेदानुसार धनादेश स्वाक्षरीचे अधिकार प्रदान करण्यात आलेल्या उपायुक्त यांना प्राधिकृत करणेस मंजुरी मिळणेबाबत कार्यालयाने प्रस्ताव सादर केला आहे.

**प्रशासकीय ठराव क्र. ३७ /२०२३** **दि.०६/०९/२०२३**

वरील प्रमाणे कार्यालयाने सादर केलेला प्रस्ताव अवलोकनी येऊन मुख्य लेखाधिकारी यांचेसह नियंत्रण अधिकारी यांना, संदर्भ क्र. २ वरील आदेशान्वये सोपविण्यात आलेल्या त्यांचे अधिनस्त् विभागाकडील विविध स्वरुपाची प्रमाणके व त्यानुसार आदा करावयाचे धनादेश संदर्भ क्र. ३ वरील तरतुदीनुसार स्वाक्षरीत करण्यासाठी प्राधिकृत करणेत येत आहे. तथापि, श्री. केतन गुजर, प्र. सहा आयुक्त् यांचेकडे सोपविण्यात आलेल्या विभागाकडील ग्रंथालय व अनाधिकृत बांधकाम हे विभाग वगळुन प्रदान प्रमाणके व त्यानुसार आदा करावयाचे धनादेश हे उपायुक्त् (मुख्यालय) यांनी स्वाक्षरीत करणेस मंजुरी देणेत येत आहे.

तसेच संदर्भ क्र. ४ वरील तरतुदीनुसार इचलकरंजी महानगरपालिकेच्या विविध विभागाकडुन वेगवेगळया स्वरुपांच्या कामांची (संविदा) करारपत्रावर मुद्रा लावण्याबद्दल स्वाक्षरी करण्यासाठी वरील परिच्छेदानुसार धनादेश स्वाक्षरीचे अधिकार प्रदान करण्यात आलेल्या उपायुक्त यांना प्राधिकृत करणेसही मंजुरी देणेत येत आहे.

धनादेश स्वाक्षरी करणे तसेच संविदांच्या करारपत्रावर मुद्रा लावणेसंबधीचे यापुर्वीचे सर्व आदेश निष्प्रभावित करण्यात येत असून यानुसार आदेश तयार करुन निर्गमित करणेत यावेत.

( ओमप्रकाश दिवटे )
**आयुक्त तथा प्रशासक**
**इचलकरंजी महानगरपालिका**

इचलकरंजी महानगरपालिका स्थापना २०२२

## इचलकरंजी महानगरपालिका

प्रस्ताव : इचलकरंजी शहरामध्ये जिल्हा वार्षिक योजनेतील अनुज्ञेय / पर्यटन मोबाइल टॉयलेट (स्टेनलेस स्टील मेक) खरेदीकामी प्रस्ताव सादर करणेबाबत.

प्रस्ताव :

कोल्हापुर जिल्हातील सर्व महानगरपालिका, नगरपरिषद व नगरपंचायत यांनी मोबाइल टॉयलेट (स्टेनलेस स्टील मेक) खरेदी करणेसाठी जिल्हा वार्षिक योजनेतील अनुज्ञेय / पर्यटन निधीतुन प्रस्ताव सादर करणेकामी. मा. जिल्हाधिकारी यांनी समक्ष सुचना दिल्या आहेत. याबाबत जिल्हा सह. आयुक्त नगरपरिषद प्रशासन कोल्हापुर यांनी या कामाचा प्रस्ताव तात्काळ सादर करणेबाबत दि. ०५/०९/२०२३ रोजीचे पत्र क्र. कार्या११/नपा/आरआर/स्वमअ/१९/२०२३ व्दारे कळविले आहे.

इचलकरंजी महानगरपालिका हददीमध्ये ज्या ठिकाणी सार्वजनिक शौचालय उपलब्ध नाहीत अशा नागरिकांना सद्य परिस्थितीमध्ये शौचालयाची व्यवस्था करुन देणे आवश्यक आहे. इचलकरंजी शहर हे वस्त्रोद्योगाचे औद्योगिक शहर असुन सदरच्या व्यवसायामध्ये काम करण्याकरीता व कामानिमित्य् बाहेरुन येणारे म्हणजेच फ्लोटींग पॉप्युलेशन हे देखील विचारात घेणे आवश्यक आहे.

इचलकरंजी महानगरपालिकेस सध्या ०५ मोबाईल टॉयलेटची (एकुण ५० सीटची) आवश्य्कता आहे. शासनाच्या GEM पोर्टलवर 10 सिटर स्टेनलेस स्टील मेक मोबाइल टॉयलेटची (10 Setar Toilet Stainless Steel Make) किंमत र.रु. १० लाख इतकी आहे. सद्य स्थितीत एकुण ०५ नग खरेदी करावयाचे असल्यास र.रु. ५० लाख ची आवश्यकता आहे.

प्रस्तुत प्रकरणामधील मोबाइल टॉयलेट शासनाच्या Gem पोर्टलवरुन खरेदी करणे आवश्यक आहे. सदर कामाचे अंदाजपत्रक तयार करुन तांत्रिक मान्यता घेऊन प्रशासकीय मंजुरीकरीता प्रस्ताव करणे आवश्यक असलेने सदरकामी प्रशासकीय ठराव करणेकामी कार्यालयाने प्रस्ताव सादर केला आहे.

**प्रशासकीय ठराव क्र. ३८ /२०२३** **दि.१५/०९/२०२३**

वरील प्रमाणे कार्यालयाने सादर केलेला प्रस्ताव अवलोकनी येऊन ODF++ च्या पार्श्वभुमीवर विविध धार्मिक, क्रिडा तसेच जत्रा, यात्रा, मेळावे व ज्या ठिकाणी नागरिक मोठ्या प्रमाणात एकत्रित येतील अशा ठिकाणी जास्तीत जास्त् मोबाईल टॉयलेट उपलब्ध् असणे गरजेचे असुन याकरीता पुरुष व महिलांसाठी स्वतंत्र सुविधा असलेले १० सिटर स्टेनलेस स्टील मेक मोबाइल टॉयलेटची (10 Setar Toilet Stainless Steel Make) एकुण नग संख्या १० विहीत पध्दतीने खरेदी करणेच्या र.रु. १,००,००,०००/- इतक्या अंदाजपत्रकास मंजुरी देणेत येत असून याकामी आवश्य्क ती तांत्रिक मंजुरी घेणेत यावी.

( ओमप्रकाश दिवटे )
**आयुक्त तथा प्रशासक**
**इचलकरंजी महानगरपालिका**

CamScanner

## इचलकरंजी महानगरपालिका

प्रस्ताव : इचलकरंजी महानगरपालिका हद्दीमधील दैनंदिन बाजार फी, स्टॉल भाडे इ. वसुली मक्ता पध्दतीने देणेबाबत.

प्रस्ताव :

इचलकरंजी महानगरपालिका हददीमधील सन २०२२-२०२३ या सालाकरीता दैनंदिन बाजार फी, स्टॉल इ. मक्ता पध्दतीने वसुलीसाठी मक्तेदार श्री. अजित तोडकर रा. इचलकरंजी यांना आधारभुत किंमत रु. ८५,४४,७८७/- इतक्या रक्कमेला व म.न.पा. अटी शर्तीस अधिन राहुन मे. प्रशासकीय ठराव क्र. १६/२०२२ दि. २६/०८/२०२२ ने १ वर्ष कालावधीसाठी मंजुर करणेत आला होता. सदर मक्तेदाराकडुन दैनंदिन बाजार फी, स्टॉल भाडे इ. वसुलीची मुदत दि. १८/१०/२०२२ ते दि. १७/१०/२०२३ अशी होती.

उक्त ठेक्याची मुदत संपत असलेने पुढील वर्षासाठी नव्याने ठेका देणेकामी निविदा करणे आवश्यक आहे. वसुलीबाबत प्रतिवर्षी ठेका काढणेऐवजी ३ वर्षासाठी ठेका देणे उचित वाटते. याकामी आधारभुत किंमत सन २०२२-२०२३ मध्ये दैनंदिन बाजार फी, स्टॉल भाडे वसुलीची आधारभुत किंमत असलेल्या रु. ८५,४४,७८७/- मध्ये १०% वाढ करुन आधारभुत किंमत रु. ९३,९९,२६२/- इतकी होते. प्रथम वर्षासाठी आधारभुत किंमत रु. ९४,००,०००/- इतकी निश्चित करणे योग्य वाटते. त्यापुढील वर्षासाठी येणा-या निविदा रक्कमेमध्ये प्रतीवर्षी १०% वाढ करणे संयुक्तिक वाटते.

(सोबत तक्ता खालीलप्रमाणे)

| अ.न. | सन (कालावधी) | आधारभुत किंमत |
|---|---|---|
| १ | प्रथम | रक्कम रु. ९४,००,०००/- |
| २ | व्दितीय | प्रथम वर्षाच्या ई निविदेमध्ये भरलेल्या उच्चत्तम रक्कमेमध्ये १०% वाढ करुन येणारी रक्कम |
| ३ | तृतीय | व्दितीय वर्षाच्या होणा-या रक्कमेच्या उच्चत्तम रक्कमेमध्ये १०% वाढ करुन येणारी रक्कम |

या व्यतिरिक्त गत वर्षाच्या ठेक्याच्या कालावधीमध्ये अटी शर्तीमध्ये काही प्रमाणात बदल करुन काही अटी वाढवणे आवश्यक वाटते. सोबत अटी शर्ती प्रारुप सादर केले आहे.

तरी म.न.पा.ने निश्चित केलेल्या उक्त् नमुद आधारभुत किंमतीवर व म.न.पा. अटी शर्तीस अधिन राहुन ३ वर्षासाठी ई निविदा प्रक्रिया करणेकामी प्रशासकीय ठरावास मंजुरी मिळणेकामी इकडे प्रस्ताव सादर केला आहे. सदर प्रस्तावावर मा. आयुक्तसो यांनी तीन वर्षाऐवजी दोन वर्षासाठी निविदा प्रसिध्द करणेबाबत सुचना केली आहे.

**प्रशासकीय ठराव क्र. ३८ /२०२३** **दि. ०४ /१०/२०२३**

वरील प्रमाणे कार्यालयाने सादर केलेला प्रस्ताव अवलोकनी येऊन इचलकरंजी महानगरपालिका हद्दीमधील दैनंदिन बाजार फी, स्टॉल भाडे, इ. वसुली कामी रक्कम रु. ९४,००,०००/- आधारभुत किंमतीवर २ वर्षासाठी विहीत तरतुदीस अनुसरुन विहीत अटी शर्तीसह ई-निविदा प्रसिध्द करणेस मंजुरी देणेत येत आहे. तसेच सदर ठेका मंजुरी नंतर तृतीय वर्षासाठी आयुक्त् व मक्तेदार यांची एकमेंकाची सहमती झालेस तिस-या वर्षासाठी मुदतवाढ देणेबाबत सक्षम प्राधिकारी यांचे मान्यतेने निर्णय करणेत येईल.

04/10/2023

( ओमप्रकाश दिवटे )

**आयुक्त तथा प्रशासक**

**इचलकरंजी महानगरपालिका**

CamScanner

## इचलकरंजी महानगरपालिका

प्रस्ताव : इ.म.पा. रविंद्रनाथ टागोर विद्यानिकेतन या शाळेची इमारत बांधणे व दुरुस्त करणे या कामास लागणारी उपयुक्त कागदपत्रे मिळणेबाबत.

संदर्भ : मा. उपनगरअभियंता, सा.बां. उपविभाग, हातकणंगले यांचे जा.क्र. सा.बां./उपवि/हात/१०९७/२०२३ दि. १८/०८/२०२३ इ. रोजीचे पत्र.

प्रस्ताव :

मा. उपअभियंता, सा.बां. उपविभाग, हातकणंगले यांनी संदर्भिय पत्र देवुन महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोयी सुविधांच्या विकासासाठी विशेष तरतुद या योजनेतंर्गत खालील नमुद काम करणेसाठी महानगरपालिकेकडुन विविध १ ते ११ मुदयांबाबत आवश्यक ती कागदपत्रे / प्रमाणपत्रे / ना – हरकत दाखला इ. मागणी केलेली आहेत.

| अ.क्र. | कामाचे नाव | रक्कम |
|---|---|---|
| १ | इचलकरंजी महानगरपालिकेचे रविंद्रनाथ टागोर विद्यानिकेतन या शाळेची इमारत बांधणे व दुरुस्त करणे. | १००.०० लक्ष |

कामाचा तपशिल पाहता सदरचे काम हे शाळा इमारत बांधकामाशी संबंधित असलेने या कामी आवश्यक ती कागदपत्रे / प्रमाणपत्रे / ना – हरकत दाखला इ. बाबींची पुर्तता ही प्राथमिक शिक्षण विभाग यांचेकडुन होणे आवश्यक आहे. बांधकाम विभागाशी संबंधित आवश्यक ती कागदपत्रे ही मागणीप्रमाणे शिक्षण विभागाकडे सादर करणेत येतील.

वरीलप्रमाणे ना हरकत व इतर कागदपत्रे देणेस मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव मा.आयुक्त तथा प्रशासक यांचेकडे सादर केला असता माननीय यांनी दिले दि.२३/९/२०२३ चे आदेशानुसार दि.२६/९/२०२३ रोजी दु. १.०० वाजता मा. उपायुक्त डॉ. प्रदिप ठेंगल व मा. उपायुक्त श्री. तैमुर मुलाणी यांचे उपस्थितीत श्री. महेंद्र क्षिरसागर, शहरअभियंता, श्री. संजय बागडे, कार्यकारी अभियंता, श्री. सतिष शिंदे, अभियंता, सा.बां. उपविभाग हातकणंगले, अलका शेलार, मुख्याध्यापिका व श्री. राजु घोडके, पर्यवेक्षक शिक्षण विभाग यांचेसमवेत म.न.पा. रविंद्रनाथ टागोर विद्यानिकेतन या शाळेची इमारत बांधणे व दुरुस्त करणे कामास मनपा चा ना हरकत दाखला देणेकामी मा. आयुक्तसो यांचे अध्यक्षतेखाली मा. आयुक्त यांचे दालनात बैठक पार पडली.

सदर बैठकीमध्ये मा. आयुक्तसो यांनी सदर दुरुस्ती कामाबाबतचा सविस्तर आढावा घेतला. मुख्याध्यापिका अलका शेलार व पर्यवेक्षक श्री. घोडके यांनी सदर शाळेची सद्यस्थिती विषद केली या अनुषंगाने मा. आयुक्तसो यांनी म.न.पा. रविंद्रनाथ टागोर विद्यानिकेतन या शाळेची इमारत बांधणे व दुरुस्त करणेकामी खालिल प्रमाणे शिफारस केली

सा.बां. विभाग, हातकणंगले उपविभाग, यांचेकडुन सदर शाळा इमारतीची स्थळपाहणी करणेत येवुन शाळेची इमारत (वर्ग खोल्या) बांधणे मुलां मुलीं साठी पिण्याच्या पाण्याची सोय करणे व टॉयलेट बांधकाम करणे या कामास प्राधान्य देणे या अटीस अधिन राहुन ना हरकत दाखला देणेस हरकत नाही तसेच जुनी इमारतीचा जीर्ण भाग जेवढी नवीन इमारत बांधणे शक्य आहे तेवढीच म.न.पा. मार्फत नियुक्त कंत्राटदार यांचे कडुन पाडुन घ्यावी.

वरीलप्रमाणे मा.आयुक्त यांनी केले शिंफारशीनुसार ना हरकत व इतर कागदपत्रे देणेस मंजुरी मिळणेबाबत कार्यालयाने प्रस्ताव सादर केला आहे.

**प्रशासकीय ठराव क्र. ४० /२०२३** **दि. ११ /१०/२०२३**

वरील प्रमाणे कार्यालयाने सादर केलेला प्रस्ताव अवलोकनी येऊन इ.म.पा. रविंद्रनाथ टागोर विद्यानिकेतन या शाळेची इमारत बांधणे व दुरुस्त करणे (अंदाजपत्रक र.रु.१०० लक्ष) कामास सार्वजनिक बांधकाम विभाग, हातकणंगले उपविभाग, यांचेकडुन शाळेची इमारत (वर्ग खोल्या) बांधणे, मुलां - मुलीं साठी पिण्याच्या पाण्याची सोय करणे व टॉयलेट बांधकाम करणे या कामास प्राधान्य देणेच्या अटीस अधिन राहुन सदर कामास ना हरकत दाखला व देखभाल दुरुस्ती प्रमाणपत्र देणेस मान्यता देणेत येत असुन उपरोक्त शाळेचा जुना इमारतीचा जीर्ण भाग जेवढी नवीन इमारत बांधणे शक्य आहे तेवढाच भाग इ.म.पा. नियुक्त मक्तेदार यांचेकडून पाडून घेणेत यावा.

११/१०/२०२३

( ओमप्रकाश दिवटे )

**आयुक्त तथा प्रशासक**

**इचलकरंजी महानगरपालिका**

CamScanner

# इचलकरंजी महानगरपालिका

**प्रस्ताव :** इचलकरंजी महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत रि.स.नं.६३८ कचराडेपो येथे असलेल्या जुन्या कच-याचे (Old legacy waste) शास्त्रोक्त पध्दतीने BIO REMEDIATION आणि BIOMINING प्रक्रिया करण्याकरिता रू.२३.३० कोटीच्या सविस्तर प्रकल्प अहवालास (DPR) तांत्रिक मान्यता प्रदान करणेबाबत.

संदर्भ :-

1) जा.क्र.मु. अ. (पुणे )/तांशा ३ / इचलकरंजी / Legacy Waste / तांत्रिक मंजूरी/ २३०२/२०२३ दि. १४/०९/२०२३
2) जा.क्र.मु.अ. (पुणे ) /तांशा ३ / इचलकरंजी / Legacy Waste/तांत्रिक मंजूरी/२२११/२०२३ दि.०४/०९/२०२३
3) इचलकरंजी महापालिकेचे पत्र जा.क्र. इमनपा/ आरोग्य / १४८०/२०२३ दि. ०७/०९/२०२३
4) अ. अ. मजीप्रा, मंडळ सांगली यांचे पत्र जा. क्र. तांशा-२/१४६४/२०२३ दि.१४/०८/२०२३

**प्रस्ताव:**

वरील विषयांकीतकामी संदर्भ क्र.१ च्या पत्रानुसार महाराष्ट्र जीवन प्राधिकरणकडून तांत्रिक मान्यता देण्यात आलेली आहे. सदर तांत्रिक मान्यतेमध्ये मजिप्रा विभाग व मंडळ, सांगली कार्यालयाने शिफारस केलेनुसार र. रू. १९,८४,११,१११/- किमतीच्या अंदाजपत्रकास एकूण अ.क्र. १ ते १८ अटीच्या अधिन राहून तांत्रिक मान्यता देण्यात आली आहे. सदर अटीमधील काही अटीसंदर्भात इकडील कार्यालयास संदिग्धता असुन त्यामध्ये यथोचित सुधारणा होणे आवश्यक आहे. सदर अटी / शर्तीचा तपशिल खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | अट क्र. | आवश्यक सुधारणा |
|---|---|---|
| १ | अट क्र. १७ सदर तांत्रिक मंजूरी फक्त प्रशासकीय मंजूरी प्राप्त करण्यासाठी आहे. प्रत्यक्ष निविदा प्रक्रिया करण्यापुर्वी सदर अंदाजपत्रक, आराखडे आवश्यकतेनुसार तपासून घेण्याची जबाबदारी इचलकरंजी महापालिकेची राहील. | सदर तांत्रिक मान्यता हि केवळ प्रशासकीय मान्यतेसाठी आवश्यक नसुन संपूर्ण काम पुर्णत्वास जाई पर्यंत ग्राहय धरणे बाबत नमुद करणे आवश्यक आहे. तसेच प्रत्यक्ष निविदा प्रक्रिया करण्यापुर्वी सदर अंदाजपत्रक, आराखडे आवश्यकतेनुसार तपासून घेण्याची जबाबदारी इचलकरंजी महापालिकेची राहील असे नमुद आहे. तथापी याबाबत कोणतीही यंत्रणा इचलकरंजी महानगरपालिकेकडे उपलब्ध नसल्याने निवीदा प्रक्रिया करणे व कामाची अंमलबजावणी करणेकामी सदर आराखडे व अंदाजपत्रक तपासुन उचित असलेबाबत विनिश्चिती व प्रमाणीत करणे आवश्यक आहे. उक्त बाबींना तांत्रिक मान्यता घेणेकामी आपल्या कार्यालयास संपुर्ण शुल्क् देखील अदा केलेली आहे. तरी उपरोक्त् कार्यवाही व्हावी. |
| २ | अट क्र ८ - निविदा काढताना कामाच्या बाबीचे वर्णन खालीलप्रमाणे असावे.<br>BIOMINING OF MUNICIPAL SOLID WASTE- Excavation for removing the existing solid waste compirising of degradable,plastic, construction and demolition waste, earth etc.accumulated in the existing dump Sites to required level, by development of labour and using screens of different sizes for sieving, using mechanical excavators and suitable equipment and transporting the excavated material (mixed solid waste) to the sieving area for sieving, segregation of the | सदर कामीचे अंदाजपत्रक तसेच शासनामार्फत निश्चित करण्यात आलेले दर याप्रमाणे हि निविदा हि प्रति MT याप्रमाणे निश्चित करणे आवश्यक आहे. तथापी आपण volumetric basis वर पेमेंट करावे असे नमूद केले आहे. यामुळे कामाची अंमलबजावणी MB रेकॉडींग तसेच देयक अदा करणेस अडचण उद्भवणार आहे. सबब याबाबत उचित सुधारणा होवुन मिळावी. |

| | | |
|---|---|---|
| | biodegradable,plastics,construction and demolition waste, soil, recyclable materials etc and storing, packing and transporting up to ०.५ km distance as per the direction of engineer in charge. Payment will be made only on volumetric basis on pre on post levels taken at the area cleared off waste. | |
| ३ | अट क्र ०९ - Manual on Municipal Soild Waste Management मधील पृ क्र.48 para क्र.1.4, 3,3,3, मध्ये density 450-500kg/m नमुद केलेली आहे, सदर प्रस्तावात density 1.2 MT/m घेण्यात आलेली दिसुन येते. ती जास्त असुन महापालिका स्तरावर खातरजमा करुन परिमाण निश्चित करुन तद्नंतर निविदेबाबतची कार्यवाही करण्याची जबाबदारी इचलकरंजी महापालिकेची राहील.<br>परिणामामध्ये (quantity) मध्ये काही बदल असल्यास त्याप्रमाणे प्रस्तावास सुधारीत तांत्रिक मान्यता घेण्यात यावी. | सदरची तांत्रिक मान्यता देतेवेळी प्रमाणके निश्चित करणे अपेक्षित असून त्याप्रमाणे प्रशासकीय मान्यता मिळालेनंतर तांत्रिक मान्यता व प्रशासकीय मान्यता रक्कमेनुसार निविदा करणे अपेक्षित आहे. परंतु आपण यामध्ये निविदेपुर्वी परिमाण निश्चित करणे संदर्भात सुचविलेले आहे. तांत्रिक मान्यता देतेवेळी इकडील कार्यालयामार्फत संदर्भ क्र.0 02 चे पत्रान्वये देणेत आलेल्या त्रूटी पुर्तता अहवालामध्ये परिमाणाबाबत खातरजमा करून आपणांकडे प्रस्ताव दाखल केला असल्याचे नमूद केले आहे.<br>आपण नमूद केलेली density ही नविन कचऱ्याची असून Manual on Municipal Soild Waste Management मधील पृ क्र. 370 para 2 मध्ये जुन्या कचऱ्याची density ही पहिल्या । वर्षी ०.८T/M' व ती पुढे १.२T/M) पर्यंत वाढत जाते असे नमूद आहे. महानगरपालिकेच्या कचराडेपोमध्ये सन 2010 पासून साठलेल्या कचऱ्यावर प्रक्रिया करणेबाबतचे काम प्रस्तावित आहे. याप्रमाणेच आपण परिमाण निश्चित करणे अपेक्षित आहे व त्यानुसार तांत्रिक मान्यतेमधील अटी शर्तीमध्ये सुधारणा होणे आवश्यक आहे. |

उपरोक्त नमुद केलेल्या मुद्यांबाबत तांत्रिक मान्यता देताना नमुद केलेल्या अटीमध्ये निर्माण केलेली संदिग्धता दुर होवून महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, पुणे विभागमार्फत स्वयंस्पष्ट व संपूर्ण कामाची एकसुत्रीपणे अंमलबजावणी करता येईल यादृष्टीने सुधारण होणे आवश्यक असलेने वरील केले मुद्देनिहाय तपशिल महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, पुणे या कार्यालयास कळविणेकामी मंजुर मिळणेस कार्यालयाने प्रस्ताव सादर केला आहे.

**प्रशासकीय ठराव क्र. ४१ / 2023** **दि. १८/१०/२०२३**

वरील प्रमाणे कार्यालयाने सादर केलेला प्रस्ताव अवलोकनी येऊन इचलकरंजी महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत रि.स.न. ६३८ कचरा डेपो येथे असलेल्या जुन्या कच-याचे (Old Legacy Waste) शास्त्रोक्त् पध्दतीने Bioremediation आणि Bioming प्रक्रिया करणेच्या प्रकल्प् अहवातील प्रस्तावात नमुद केली अट क्र. ८ , ९ व १७ मध्ये करणेत आलेल्या सुधारणासह उपरोक्त् मुद्देनिहाय तपशिल महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, पुणे यांचेकडे पाठवणेत येवुन MaRS या तांत्रिक सेवा सल्लगार संस्थेमार्फत करणेत आले र.रु. १९.८४ कोटी (जीएसटी वगळुन) मुळ डिपीआर किंमत र.रु. २३.३० कोटी (जीएसटी, म.जी.प्रा. तांत्रिक शुल्क् व कन्स्लटन्सी फी सह) इतक्या किंमतीच्या प्रकल्प् अहवाल (डिपीआर) राबविणेसाठी मान्यता देणेत येत असुन सदर प्रकल्प अहवालास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव मा. अभियान संचालक, स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) मुंबई यांचेकडे पाठविणेसही मंजुरी देणेत येत आहे.

18/10/2023

**(ओमप्रकाश दिवटे)**
**आयुक्त् तथा प्रशासक**
**इचलकरंजी महानगरपालिका**

CamScanner